**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

**विद्यापीठाच्या बुद्धिस्ट स्टडीज सेंटरद्वारे चित्रकला स्पर्धेचे आयोजन ३० एप्रिलला**
**शालेय विद्यार्थ्यांनी नांव नोंदणी करण्याचे आवाहन**

अमरावती.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या बुद्धिस्ट स्टडीज सेंटरद्वारे बुद्ध पौर्णिमेनिमित्त वय वर्षे ७ ते १५ मुलांसाठी चित्रकला स्पर्धा व वय वर्षे ७ पर्यंत चित्रामध्ये रंग भरणे स्पर्धेचे आयोजन दि. ३० एप्रिल, २०१८ रोजी सकाळी ९.०० वाजता विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागात करण्यात आले आहे. स्पर्धेचे उद्घाटन कुलगुरु डॉ. मुरलीधर चांदेकर यांचे शुभहस्ते होणार असून कुलसचिव डॉ. अजय देशमुख, वित्त व लेखा अधिकारी डॉ. शशीकांत आस्वले यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

चित्र काढण्यासाठी लागणारे कागद केंद्राद्वारे पुरविण्यात येणार असून रंग भरण्यासाठी सर्व साहित्य स्पर्धकांना स्वतः आणावयाचे आहेत. स्पर्धेचे बक्षीस वितरण प्र-कुलगुरु डॉ. राजेश जयपूरकर यांचे शुभहस्ते होणार असून परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ.जे.डी. वडते यांची उपस्थिती लाभणार आहे.

नाव नोंदणीसाठी समन्वयक डॉ. गजानन मुळे (दूरध्वनी क्र. ९८५०३२५३७९), प्रा. विनोद नागले (दूरध्वनी क्र. ९९२२११२३३२) आणि डॉ. कपिल कांबळे (दूरध्वनी क्र. ९८२२६०४२१२) यांचेशी संपर्क साधता येईल. तरी स्पर्धेचा जास्तीतजास्त मुलांनी लाभ घ्यावा, असे आवाहन विद्यापीठाच्यावतीने कुलसचिव डॉ. अजय देशमुख यांनी केले आहे.

---

प्रति, **जनसंपर्क विभाग**
मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी दि. २५/०४/२०१८.
दै.............................. अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी